# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. एकनाथ बाबू मोरे

### मु.पो. कादिवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी



- शेतीकडे व्यापारी दृष्टीकोन ठेवून शेती व्यवसाय सुरु व माळरानावरील जमिनी कराराने घेऊन शेती करण्यास सुरुवात.
- विहीर खोदून पाण्याचे साधन निर्माण केले व उताराच्या जमिनीवर मजगीचे काम तसेच समपातळीत बांधबंदिस्ती केल्यामुळे मृद व जलसंधारणाचे उत्कृष्टरित्या काम.
- भाजीपालावर्गीय पीके मोठया प्रमाणावर घेत असून बांधावर चवळी, तूर, झेंडू यांची लागवड व भाजीपाला उत्पादकांचा गट स्थापन करण्यामध्ये पुढाकार.
- उपवासासाठी वापरले जाणारे 'कणगर' या कंद पीकाची मोठया प्रमाणावर लागवड.
- तालुका पातळीवर भात पीक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक.
- शेती व्यवसायाला पूरक जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन.

५२

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. विजय यशवंत पाटील

### मु.पो. खंबाळा, ता. भिवंडी, जि. ठाणे



- जमिनीचे सपाटीकरण करुन भातशेती बरोबरच भाजीपाल्याची लागवड.
- रो.ह.यो.अंतर्गत जवाहर विहीरीचा लाभ व जमिनीचे सपाटीकरण व बांधबंदिस्ती करुन जल व मृद संधारण
- सुधारित पध्दतीने भातपीकाची लागवड करुन तालुका पातळीवर भातपीक स्पर्धेत प्रथम क्रमांक
- हिरवळीचे खतासाठी बांधावर गिरीपुष्प तसेच माळरानावर साग, बांबू यांची लागवड
- गावामध्ये शेतकरी मंडळ व बचतगटाची स्थापना.
- झेंडू व शेवंती याच्या सुधारित वाणाची लागवड करुन फुलशेती
- शेतीला पूरक जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन तसेच शासकीय योजनेतून शेततळे व त्यामध्ये मत्स्यपालनाचा व्यवसाय

५३

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. उल्हास बहिरु जाधव

### मु.पो. शेणीत, ता. इगतपूरी, जि. नाशिक



- आंतरमशागतीच्या वेळी २/३ चर काढून जलसंधारण केले तसेच विहीर व नाल्यातील पाणी अडवून भातशेती.
- आधुनिक शेती तंत्रज्ञान अवगत करुन दरवर्षी खोल नांगरट, बांधावरील गवत काढून नष्ट करणे, कोरडा पालापाचोळा तसेच दशपर्णी व निंबोळी अर्काचा वापर.
- भातपीकाचे उत्पादन वाढविण्यासाठी चारसूत्री पध्दतीने लागवड करुन दिडपट उत्पादन.
- भात, ऊस याबरोबरच आले व हळद या पिकांची लागवड.
- रासायनिक खतांचा किफायतशीर वापर करण्यासाठी युरिया ब्रिकेट मशीन घेऊन परिसरातील शेतक-यांना खताच्या संतुलित वापराचे महत्व पटवून देण्याचे काम.
- शेतीस पूरक व्यवसाय म्हणून मत्स्य व्यवसाय व दुग्धव्यवसाय.

५४

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. दत्तू रामभाऊ ढगे

### मु. पो. बेलगाव ढगा, ता. जि. नाशिक



- पेरु, अंजीर, आंबा, सिताफळ, चिंच, केळी, द्राक्षे यासारखी फळपीके असून भात, गहू, हरभरा इत्यादी पीके व गुरांसाठी फुले जयवंत हे चारापीक.
- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची भाजीपाला उत्पादनाची पदविका तसेच महात्मा फुले कृषि विद्यापीठ येथून प्लॅस्टिकल्चरच्या तंत्रज्ञानाबाबतचे प्रशिक्षण
- भाजीपाला रोपे संवर्धन करुन रोपवाटिकेची स्थापना.
- ताग व धैंचा या पिकाची नियमित लागवड करुन शेतात हिरवळीचे खत म्हणून वापर
- शेततळयामध्ये रोहू, कटला व मृगल इत्यादींचे मत्स्योत्पादन
- पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन तसेच ‘कृषि वसंत‘ या पुरस्काराने गौरवित

५५

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. संतोष महादेव राऊत

### मु. पो. निमगाव केतकी, ता. इंदापूर, जि. पुणे



५६

- कृषि पदवीधर असल्याने मागील १५ वर्षापासून शेतीमध्ये सतत नवनवीन प्रयोग व परिसरातील शेतक-यांसाठी प्रगतशील शेतीचा आदर्श.
- बागायती शेती असूनही ठिबक सिंचनाचा वापर करुन पाण्याच्या बचतीचा मूलमंत्र जपला.
- शेततलाव बांधून पावसाळयामध्ये वाया जाणा-या पाण्याची तलावामध्ये साठवणूक.
- भाडेतत्वावर (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) सुमारे १९ हे. क्षेत्रावर डाळींब फळपीकाची लागवड
- आंतरराष्ट्रीय शेतीमधील नवीन प्रवाह, शेतीपध्दत इत्यादीसाठी आयसीएआर नवी दिल्ली यांच्या माध्यमातून मलेशिया देशाचा दौरा करुन तंत्रज्ञान आत्मसात.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. दौलत नारायण भाकरे

### मु.पो. माळवाडी, ता. शिरुर, जि. पुणे



५७

- विविध ठिकाणी आयोजित करण्यात येणारे कृषि प्रदर्शन, कृषि मेळावे यामध्ये सहभागी होऊन नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात.
- जमिनीचे सपाटीकरण करुन अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी चर काढले व शेतामध्ये समपातळी बांध घालून कंटुर पध्दतीने पेरणी.
- उताराला आडवे सारे पाडून मूलस्थानी जलसंधारण व जमिनीचा पोत टिकविण्यासाठी शेणखत, हिरवळीचे खत तसेच कंपोस्ट खताचा वापर
- शेतामध्ये आंबा, चिकू, डाळींब, पेरु इत्यादी फळपीके असून शेतीच्या बांधावर नारळ व साग या पीकाची लागवड
- शेतीस पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन व म्हशींसाठी आधुनिक गोठयाची उभारणी.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. प्रमोद कल्लाप्पा चौगुले

### मु.पो. गडमुडशिंगी, ता. करवीर, जि. कोल्हापूर



- जमिनीचे सपाटीकरण  व बांधबंदिस्ती करुन शेतामध्ये जलसंधारण
- जमिनीच्या मगदुराप्रमाणे ऊस, सोयाबीन, भूईमुग, केळी यासारख्या पिकांची लागवड व जमिनीचा पोत सुधारण्यासाठी कंपोस्ट खत, गांडूळ खत यांचा वापर.
- ऊस व केळी  पिकांमध्ये भाजीपाल्यासारखी बोनस पीके घेण्याबाबत प्रसार.
- जमीन नापिक होऊ नये म्हणून गांडूळ खताची निर्मिती करुन त्याचा वापर तसेच फवारणीसाठी व्हर्मिवॉशचा वापर
- शेती आधुनिक व नैसर्गिक होण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब व शेतीस जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय  .
- तालुका स्तरावरील पीक स्पर्धेमध्ये सोयाबीन उत्पादनात प्रथम क्रमांक

५८

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. नागेश कृष्णा बामणे

### मु.पो. सरोळी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर



५९

- कृषि विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या अभ्यास सहलीमध्ये वेळोवेळी सहभागी होऊन नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती आत्मसात करण्याकडे कल.
- शेतीच्या बांधावर स्टाईलो गवत, सुबाभूळ, निलगिरी, आंबा व २ एकर क्षेत्रावर रोजगार हमी योजनेमधून काजू फळबाग लागवड
- ऊसाचे पाचट न जाळता ते एकाआड एका सरीमध्ये ठेवल्यामुळे त्याचा आच्छादनासारखा उपयोग
- प्लॅस्टिक मल्चिंग सारख्या सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करुन उन्हाळी भूईमुग पीक
- शेतीस पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय व मधुमक्षिकापालन
- राज्यस्तरावरील भात पीक स्पर्धामध्ये द्वितीय क्रमांक

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. भिकनराव भिमराव वराडे

### मु. पो. नळणी बु., ता. भोकरदन, जि.जालना



- कापसाच्या सरळ वाणाची ५ एकर क्षेत्रावर ४ x १ फूट अंतराप्रमाणे लागवड करुन एकरी ९ क्विंटल उत्पन्न
- पुर्णा नदीपासून ७००० फूट पाईपलाईन करुन शेतात पाणी आणले.
- ५ एकर क्षेत्रावर मोसंबीची लागवड करुन त्यामध्ये सोयाबीन, हरभरा, गहू, मूग अशी आंतरपीके
- सन २०१२ व २०१३ मध्ये डाळींब बागेचे व्यवस्थापन केल्यामुळे दुष्काळी परिस्थितीत देखील अत्यंत चांगले उत्पादन
- राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत एक कोटी लिटर क्षमतेचे शेततळे खोदून अस्तरीकरण
- शेतीस पूरक व्यवसाय म्हणुन दुग्धव्यवसाय, मधुमक्षिकापालन, गांडूळखत निर्मिती
- ग्रामपातळीवर पीकस्पर्धेमध्ये भाग घेऊन कपाशीचे एकरी २५ क्विंटल उत्पादन

६०

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. नामदेव कृष्णाजी जगदाळे

### मु. महाजनवाडी, पो. बोरखेड, ता. जि. बीड



६१

- कृषि विभागामार्फत आयोजित करण्यात येणाया सहली, शेतक-यांचे मेळावे व प्रशिक्षण कार्यक्रमांना उपस्थित राहून व कृषि विद्यापीठांच्या प्रक्षेत्रांना भेटी देऊन आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात
- ऊस, डाळींब, चिकू, नारळ, सोयाबीन यासारखी सुधारित तंत्रज्ञानावर आधारीत पीके
- शेतावर गांडूळखत निर्मिती करुन त्याचा वापर केल्यामुळे जमीनीची सुपिकता टिकविण्यास मदत
- उपलब्ध बाजारपेठ, ग्राहकांची मागणी व पुरवठा या तंत्राचा अभ्यास करुन, ठिबक सिंचन वापरुन खरबूज पीक.
- आकाशवाणी केंद्रावरुन पशुसंवर्धन व्यवस्थापनाबाबत मुलाखत देऊन इतरांना मोलाचे मार्गदर्शन.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. नारायण भिमराव चौधरी

### मु. पो. दुधड, ता. जि. औरंगाबाद



६२

- संपूर्ण जमिनीमध्ये सिंचन तलावातील गाळ टाकल्यामुळे जमिनीची सुपिकता वाढण्यास मदत
- डाळींब पिकाची लागवड १२ x १२ फूट तसेच १५ x ९ फूट अंतरावर केल्यामुळे पुर्वीच्या उत्पन्नात ४ ते ५ पटीने वाढ
- शासकीय योजनेमधून ६५ लाख लिटर क्षमतेचे शेततळे करुन शेताच्या बाजूने वाहणा-या नाल्याच्या पाण्यातून शेततळे भरुन घेतले
- शिरपूर पॅटर्नचा अवलंब करुन नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण केल्यामुळे नाल्यात भरपूर पाणी
- फळबागेसाठी प्लॅस्टिक आच्छादनाचा वापर केल्याने ३५ ते ४० टक्के पाण्याची बचत .
- शेतीस पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. भिमराव विठ्ठलराव कदम

### मु. रावणगाव, पो. लगळूद, ता. भोकर, जि. नांदेड



६३

- शेतीमधील सततच्या नाविन्यपूर्ण प्रयोगामुळे परिसरातील शेतक-यांकरीता चालतेबोलते शेतकरी माहिती केंद्र
- पारंपारिक पध्दतीने शेती न करता सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करुन  फळबाग लागवड
- माती परिक्षणाच्या शिफारशींनुसार रासायनिक खते व सूक्ष्म मूलद्रव्यांचा वापर
- राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सामूहिक शेततळे घेतले असून प्लॅस्टिक आच्छादनाचा वापर
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री.शेषराव सोपानराव निरस

### मु.पो.पडेगाव, ता. गंगाखेड, जि. परभणी



६४

- पंचक्रोशीमध्ये रामप्रभू या नावाने परिचित, सर्वप्रथम शेतामध्ये दोन विहिरी खोदून पीक उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान अवगत करुन स्वत:च्या शेतावर प्रत्यक्ष राबविण्यास सुरुवात.
- पाणी अडवा पाणी जिरवा या कार्यक्रमांतर्गत शेतीची बांधबंदिस्ती
- पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमात हिरीरीने भाग घेऊन गावाच्या शिवारात दोन सिमेंट बंधारे करुन घेतले
- संकरित व अधिक उत्पादन देणा-या वाणांची निवड करुन इतर शेतक-यांना प्रात्यक्षिके दाखवून माहिती
- शेतीस जोडधंदा म्हणून रेशिम उद्योग तसेच दुग्धव्यवसाय

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री.उत्तमराव शंकरराव भोसले

### मु. पो. शेंबोली, ता. मुदखेड, जि. नांदेड



६५

- माती परिक्षणाच्या शिफारशींनुसार रासायनिक खते व सूक्ष्म मुलद्रव्यांचा वापर
- शेतावर गांडूळखत निर्मिती करुन त्याचा वापर केल्याने जमिनीची सुपिकता टिकविण्यास मदत
- कलिंगड पिकाच्या लागवडीसाठी मल्चिंग पेपरचा वापर केल्याने तणांचा बंदोबस्त होऊन मशागत खर्च कमी
- केळी तसेच पपई या पिकांची आधुनिक पध्दतीने लागवड तसेच फळांच्या विक्रीसाठी नांदेड, औरंगाबाद, नागपूर, चंदीगड या ठिकाणच्या बाजारपेठेमध्ये स्वतः मार्केटिंग करीत असल्यामुळे उत्पन्नामध्ये वाढ
- शेतीला पूरक धंदा म्हणून दुग्धव्यवसाय

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. ज्ञानेश्वर जगदेवराव गायकवाड

### मु. गिरडा, पो. पाडळी, ता.जि. बुलढाणा



- जमिनीचे सपाटीकरण व बांधबंदिस्ती करुन मृद व जलसंधारणाचे काम.
- डाळींबाच्या १२५० कलमांची लागवड व उन्हाळयामध्ये कमी पाण्यात नियोजन करुन पीक बहार कायम, डाळींबाच्या बागेला विदर्भ व मराठवाडयातील अनेक शेतक-यांच्या भेटी
- राष्ट्रीय फलोत्पादन विभागाकडून सामूहिक शेततळयाचा लाभ घेतल्यामुळे पाण्याची सुविधा होण्यास मदत
- एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनेतून रासायनिक खतासोबतच शेणकाला, गोमूत्र, कडधान्याची स्लरी व जिवाणू खते यांचा वापर
- जिल्हा डाळींब संघाच्या वतीने डाळींब पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम व चर्चासत्राचे आयोजन
- कृषिदिनी कै.वसंतराव नाईक प्रगतीशील शेतकरी प्रथम पुरस्कार देऊन जिल्हा परिषद बुलढाणातर्फे गौरवीत

६६

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## गजानन शेतकरी स्वयंसहाय्यता गट

### मु.पो. कोंडाळा झामरे, ता.जि. वाशिम

### अध्यक्ष- श्री.नितीन मदनराव इंगोले



- गटातील सर्व १७ शेतकरी तरुण वर्गातील
- गावामध्ये एकूण २१ गट स्थापन करुन बी.बी.एफ.प्लॅन्टरने पेरणी केल्याने जलसंधारण होऊन चांगले उत्पन्न
- गावाची निवड विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमामध्ये करण्यात आलेली असल्यामुळे बांधबंदिस्ती, नाला सरळीकरण व रुंदीकरण, शेततळे, विहिर पुनर्भरण, पंपसंच तसेच तुषार व ठिबक सिंचन अशा विविध घटकांचा शेतक-यांना लाभ.
- सदर कार्यक्रमामुळे गावाच्या ओलीताखालील क्षेत्रात ३० टक्के वरुन ७४ टक्केपर्यंत वाढ व जवळपास संपुर्ण गावाची शेती ओलीताखाली.

६७

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. प्रदीप केशवराव तेलखडे

### मु. बहाद्दरपूर, पो. फुलआमला, ता. भातकुली, जि.अमरावती



➢ कोरडवाहू शेती तंत्रज्ञानामध्ये उताराला आडवी पेरणी करणे, कंटूर बंडिंग, तण व्यवस्थापन, सुक्ष्म अन्नद्रव्यांची व सेंद्रिय घटकांची फवारणी यासारख्या तंत्रज्ञानाचा प्रसार

➢ शेतामध्ये बोरु व धैंचा या पीकांचा हिरवळीचे खत म्हणून उपयोग तसेच किड व रोग नियंत्रणासाठी एकात्मिक पीक संरक्षणाचा अवलंब.

➢ भातकुली तालुक्यातील शेतकरी गटांना एकत्रित करुन संत गाडगेबाबा फार्मर प्रोडयुसर कंपनी लिमिटेडची स्थापना.

➢ शेतातील सर्व पाणी एका ठिकाणी विहिरीच्या बाजूला शेततळयात साठवून पुनर्भरण

➢ पूरक व्यवसाय म्हणून मळणी यंत्राद्वारे उत्पन्न

६८

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## श्री. चोपराम गोविंदा कापगते

### मु. सिंदीपार, पो. बोपाबोडी, ता. सडकअर्जुनी, जि. गोंदिया



- मातीं व पाणी वाहून जावू नये म्हणून भात खाचरे तयार करुन बांधबंदिस्ती
- श्री पध्दतीने भात पीकाची लागवड करीत असून खताचा किफायतशीर वापर होण्यासाठी युरिया ब्रिकेटचा वापर
- भात पिकाची उत्पादकता जिल्हयाच्या सरासरीपेक्षा १५० टक्के जास्त
- खरीप हंगामात ऊस, केळी, तूर तर रब्बी हंगामात गहू, हरभरा आणि उन्हाळी हंगामात टरबूज व भाजीपाल्यांचे उत्पादन
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय, शेळीपालन व मत्स्यशेती

६९

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## सर्वसाधारण गट

## सौ. जिजाबाई वासुदेव बोरकर

### मु.पो. जाटलापूर, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर



- शेताचे बांधावर साग व आंबा पिकाची लागवड
- माती परिक्षणाच्या शिफारशीनुसार रासायनिक खते व सूक्ष्म मुलद्रव्यांचा वापर.
- शेताला लागून असलेला नाला अडवून शेतीला पंपाद्वारे पाणी उपलब्ध व त्या पाण्याचा सुनियोजित वापर होण्याच्या दृष्टीने तुषार सिंचन पध्दतीचा अवलंब
- शेतात फळबागेसाठी आंबा पिकाची लागवड व त्याबरोबरच हळद, तूर व भाजीपाला इत्यादी नगदी पिकांचे उत्पन्न
- शांती महिला बचत गटाची स्थापना व पूरक व्यवसाय म्हणुन कुक्कुटपालन व गोपालन

७०

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## आदिवासी गट

## श्री. तात्या श्रावण हंबीर

### मु. पो. बेंडशिळ (चिकणीची वाडी), ता. अंबरनाथ, जि. ठाणे



७१

- एकूण ४.२३ हेक्टर जमीन असून ३ हेक्टर बागायत व १.२३ हेक्टर जिरायत क्षेत्र, संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेतामध्ये सिंचन विहीरीचे काम व ओ.टी.एस.पी.योजनेतून सिंचन सुविधा
- शेतीच्या कामासाठी पॉवर टिलर व शेती औजारांची खरेदी.
- सेंद्रिय शेतीचे महत्व ओळखून गांडूळ खत व कंपोस्ट खत उत्पादनास सुरूवात.
- अन्नधान्य पिकाबरोबरच आंबा, काजू, आवळा, सिताफळ, जांभूळ या फळपिकांची तसेच सागाची लागवड.
- शेती व्यवसायाबरोबरच जोडधंदा म्हणून रोपवाटीका, दुग्धव्यवसाय व मत्स्यपालन

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## आदिवासी गट

## श्री. विजय रामदास पवार

### मु. कालदर, पो. बोदगाव, ता. साक्री, जि.धुळे



७२

- ११ एकर डाळींब बागेची शास्त्रोक्त पध्दतीने लागवड.
- आंबा, चिकू, नारळ, जांभूळ, सिताफळ, आवळा, रामफळ या फळझाडांची तसेच कांदा व भाजीपाल्याची लागवड.
- ट्रॅक्टरचलीत सुधारित औजारांचा वापर करुन आधुनिक पध्दतीने शेती.
- शेतावर मृद व जलसंधारणाची कामे केल्याने भूजल पातळीत वाढ.
- सेंद्रिय खत व गांडुळ खताचा वापर.
- मिरची पूड व हळद पावडर तयार करणेचा पूरक व्यवसाय तसेच दुग्धव्यवसाय, पशुपालन इ. जोडव्यवसाय.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## आदिवासी गट

## श्री. दिलीप जेजीराम सुर्यवंशी

### मु.वाठोडा (केरोबा नगर), पो. केळझर, ता.बागलाण, जि. नाशिक



- गांडूळखत निर्मिती करुन त्याचा वापर केल्याने जमिनीची सुपिकता टिकविण्यास मदत.
- सिंचन सुविधेकरीता आदिवासी उपयोजनेंतर्गत विहिरीचा लाभ.
- परिसरातील अनेक आदिवासी शेतक-यांना कमी खर्चात जास्त भाजीपाला उत्पादन घेण्याबाबत मार्गदर्शन.
- आले लागवड सरी वरंबा पध्दतीने करुन चांगले आर्थिक उत्पादन.
- ग्रामस्थांच्या मदतीने पाडयावर जंगलाचे संवर्धन व पोलिओमुक्त गाव, कुपोषणमुक्त गाव तसेच पर्यावरण संतुलीत समृध्दग्राम योजनेंतर्गत विशेष योगदान
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून इमूपालन व दुग्धव्यवसाय.

७३

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## आदिवासी गट

## श्री. नाना इसमल पावरा

### मु. चोंदवाडे, पो. मांडवी बु., ता. अक्राणी, जि. नंदूरबार



- शेतावर काजू प्रक्रिया युनिटची उभारणी, या युनिटला हॉलंड येथील अभ्यासकांची भेट.
- मृद व जलसंधारणासाठी उतारास आडवे चर घेऊन आंबा या फळपिकाची लागवड.
- चारा पिकांसाठी मका पिकाची लागवड.
- पिकांवरील कीड व रोगाबाबत चांगले ज्ञान असून याबाबत इतर शेतक-यांना मार्गदर्शन.
- शेतावर आंबा व काजू या फळपिक रोपवाटीकेची निर्मिती.
- शेतीस पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुटपालन व दुग्धव्यवसाय.

७४

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## आदिवासी गट

## श्री. लक्ष्मीकांत सुदाम रेंगडे

### मु. खामगाव, ता. जुन्नर, जि. पुणे



- तज्ज्ञांच्या सल्यानुसार सुधारीत अथवा संकरीत बियाण्याची पेरणी करुन जास्तीत जास्त उत्पादन.
- खरबुजासारखे कमी कालावधीचे पीक घेऊन त्यास प्लॅस्टीक मल्चींग करुन भरघोस उत्पादन.
- डाळींब, आंबा, जांभूळ, केळी व पपई  या फळपिकांची लागवड.
- हिरवळीचे खतासाठी तागाची पेरणी.
- शेतीस पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय.
- लेझीम पथक तयार केले असून गणपती उत्सव, महाशिवरात्र इ. सार्वजनिक उत्सवामध्ये पथकाचा उपयोग.

७५

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## आदिवासी गट

## श्री. गजानन अरुण कळंबे

### मु.पो. बान्सी, ता. पुसद, जि. यवतमाळ



- ठिबक सिंचन व प्लॅस्टीक आच्छादनाचा वापर करुन टरबुज, मिरची, केळी, वांगी व टोमॅटो यांचे मागील तीन वर्षापासून विक्रमी उत्पादन
- अकोला आणि राहूरी येथील कृषि विद्यापीठांना भेटी देऊन नवीन तंत्रज्ञान अवगत.
- दरवर्षी सुधारित व संकरीत वाणांचे बियाणे वापरुन अधिक उत्पादन.
- शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी कृषि प्रदर्शनास भेटी .
- सामाजिक कार्याची आवड असून ग्रामस्वच्छता अभियान, कुटुंबनियोजन कार्यक्रम, अंधश्रध्दा निर्मुलन, दारुबंदी, कु-हाडबंदी इ.कार्यक्रम राबविणेकरीता ग्रामपंचायतीस नेहमी सहकार्य .

७६

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१३

## आदिवासी गट

## श्री. कुंजीलाल नरसू कुंभरे

### मु. उसरीपार, पो. देवलापार, ता. रामटेक, जि. नागपूर



- शेतीमध्ये नवनवीन प्रयोग,'श्री' पध्दतीने भात लागवड
- सेंद्रिय पध्दतीने सुगंधी व औषधी पिकांची लागवड करून शेतक-यांना मार्गदर्शन.
- सुगंधी औषधी वनस्पतींचे तेल काढण्याचे संयंत्र बसविले असून त्यावर काढलेल्या तेलास व्यापा-यांची चांगली मागणी.
- मधुमक्षिका पालन आणि कुक्कुटपालन केले असून याबाबतही शेतक-यांना मार्गदर्शन.
- संत्रा तथा धान्य महोत्सवात सक्रिय सहभाग घेऊन स्टॉलच्या माध्यमातून विक्री.
- पीक स्पर्धेत सहभाग घेऊन पंचायत समिती स्तरावरील द्वितीय क्रमांक.